15 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. पवार हे महान इतिहास विश्लेषक

## डॉ. यशवंत थोरात : पहिले पॉलिटिकल सुपरिटेंडेंट मेजर ग्रॅहम संकलित ग्रंथाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : 'इतिहासात हरिकथा म्हणणाऱ्यांची कमी नाही, मात्र मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी केलेल्या कार्यावर प्रकाशझोत टाकणारे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाचे महान विश्लेषक आहेत. त्यांची मराठा इतिहासावरील पकड मजबूत आहे,' असे मत नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांनी व्यक्त केले. ग्रॅहॅम यांचा अहवाल इतिहासाचा दस्तऐवज असून, त्याचा आधार घेतल्याखेरीज कोल्हापूरचा इतिहास लिहिता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. मराठा इतिहास केवळ महाराष्ट्र नव्हे, तर देशाच्या इतिहासाचा अविभाज्य घटक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार संपादित कोल्हापूर संस्थानचे पहिले पॉलिटिकल सुपरिटेंडेंट मेजर डी. सी. ग्रॅहम यांनी संकलित केलेल्या 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन दि प्रिन्सिपलीटी ऑफ कोल्हापूर (१८५४)' ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते ग्रंथ प्रकाशन झाले. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज प्रमुख पाहुणे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. थोरात म्हणाले, "ग्रॅहॅम यांचा अहवाल आजच्या परिस्थिती लक्षात घेता 'बॉस'ला काय हवे आहे, यापेक्षा वस्तुस्थिती काय आहे, यावर आधारित आहे. इतिहास वास्तवात घडलेल्या घडामोडींची माहिती देतो. त्यातील ठराविक काळाचा इतिहास वगळता येत नाही. तुमची विरासत काय आहे, असा प्रश्न कोणी विचारला तर त्याचे विश्लेषण करता आले पाहिजे. लोकशाही, धर्मनिरपेक्ष व समाजवादी देशात राहत असताना आपण लोकशाहीवादी आहोत का, याचा विचार करायला हवा. लोकशाहीची साधने घेऊन वाटचाल करत असताना खरी लोकशाही नांदते का, याचा धांडोळा घेणे आवश्यक ठरते. या स्थितीत सत्याशी तडजोड न करता मांडणी करणे गरजेचे असते."

दरम्यान, विद्यापीठातर्फे इतिहासविषयक प्रकाशित पुस्तके इंग्रजीत भाषांतरित व्हावीत, अशी अपेक्षा डॉ. थोरात यांनी व्यक्त केली. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यास अनुकुलता दर्शवली.

डॉ. पवार म्हणाले, "हा संपादित ग्रंथ आद्य साधन ग्रंथ आहे. आधुनिक इतिहासाची सुरवात त्याच्यापासून होते. सात वर्षे काम करून त्याने हा अहवाल तयार केला. हा अहवाल १८५४ ला प्रसिद्ध झाला. तो एका विषयाला वाहिलेला नाही. कृषी, जाती, भाषा, शास्त्री, ग्रंथ, उद्योगधंदे आदींचा समावेश त्यात आहे. कृषी क्षेत्राविषयी सूक्ष्म अभ्यास यात आहे. त्यामुळे हा अहवाल खासदार राजू शेट्टींना देणे आवश्यक आहे." प्र-कुलगुरुपदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार झाला. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या व कोल्हापूर संस्थानचे पहिले पॉलिटिकल सुपरिटेंडेंट मेजर डी. सी. ग्रॅहम यांनी संकलित केलेल्या "स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन दि प्रिन्सिपलीटी ऑफ कोल्हापूर (१८५४)" ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, प्र-कुलगुरू डॉ. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

### महिन्याला केवळ १ रुपया मानधन

**डॉ. शिर्के यांनी डॉ. पवार हे शाहू संशोधन केंद्राचे संचालक म्हणून महिन्याकाठी केवळ एक रुपया मानधन घेत असल्याचे सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला.**

### ग्रॅहॅमच्या अहवालात अंबाबाई असा उल्लेख

**डॉ. पवार म्हणाले, "ग्रॅहॅमने त्याच्या मूळ ग्रंथात तीन ते चार वेळेला अंबाबाई असा उल्लेख केला आहे. काही ठिकाणी त्याने महालक्ष्मी ऊर्फ अंबाबाई असे लिहिले आहे. त्यामुळे तत्पूर्वी किमान पन्नास ते शंभर वर्षांपूर्वी ही देवी अंबाबाई या नावाने परिचित होती, हे स्पष्ट होते." दरम्यान, टिपू सुलतान कोल्हापूरला येऊन गेल्याची माहितीही डॉ. पवार यांनी दिली.**

15 AUG 2017

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रॅहॅम रिपोर्टमध्येही 'अंबाबाई' असाच उल्लेख

## डॉ. जयसिंगराव पवार यांची माहिती : विद्यापीठात 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

करवीर संस्थानच्या इतिहासात करवीर निवासिनी अंबाबाईच असा उल्लेख केला जात होता. दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटीश अधिकारी ग्रॅहमने कोल्हापूर संदर्भात लिहिलेल्या रिपोर्टमध्येही अंबाबाईच असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. तत्कालिन कोल्हापुरातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थितीचीही सविस्तर माहिती ग्रॅहम रिपोर्टमध्ये आहे. त्यामुळे या ऐतिहासिक दस्ताऐवजाचे कोल्हापूरसाठी वेगळे महत्व आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

गेल्या वर्षभरापासून कोल्हापुरात करवीर निवासिनी अंबाबाई की महालक्ष्मी असा वाद निर्माण झाला असताना ग्रॅहम रिपोर्टमधील उल्लेखामुळे त्याकाळी प्रचलित असणारी अस्सल माहिती पुढे आली आहे. ग्रॅहमने आपल्या रिपोर्टमध्ये तीन ते चार वेळा अंबाबाई असा उल्लेख केला आहे, त्यामुळे २०० वर्षापुर्वी करवीर निवासिनी अंबाबाईच म्हटले जात असल्याचे स्पष्ट होते, डॉ. पवार यांनी सांगितले.

ब्रिटीश पोलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहम यांनी दोनशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाचे सोमवारी शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात प्रकाशन झाले. यावेळी डॉ. पवार बोलत होते. प्रकाशन सोहळ्याला श्रीमंत शाहू महाराज आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. यशवंत थोरात. सोबत डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

डॉ. पवार म्हणाले, 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' हा ग्रंथ कोल्हापूरमधील तत्कालिन पोलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी सात वर्षे कष्ट करून संकलित केलेला हा ग्रंथ आहे. यामध्ये २०० वर्षांपूर्वीची कोल्हापूरची सर्वांगिण माहिती आहे. कोल्हापूरच्या आधुनिक इतिहासाची माहिती या ग्रंथातून मिळण्यास मदत होते. त्या काळातील कोल्हापूरची शेती, उद्योगधंदे, जाती, भाषा, चालीरिती, संस्कृतीचा इतिहास सांगणारा हा मोलाचा असा ग्रंथरूपी ठेवा आहे. कोल्हापूरच्या कोणत्याही जगतातील इतिहास लिहिताना ग्रॅहम रिपोर्टचा आधार संशोधकांना घ्यावाच लागेल इतके याचे महत्व आहे. कोल्हापूरच्या तत्कालीन शेती, उद्योग, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रातील माहितीचा स्त्रोत म्हणून ग्रॅहम रिपोर्टचे महत्व आहे.

डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, माझ्या आजवरच्या कारकीर्दीमध्ये अनेक रिपोर्ट मी पाहिले. पण दोन शतकांहून अधिक काळापूर्वी तयार केलेला हा रिपोर्ट उत्कृष्ट असाच आहे. घटनात्मक मुल्ये जपली नाहीत, तर राज्यघटना बरखास्त करण्याची वेळ आल्याखेरीज राहणार नाही, असा इशारा १९५० मध्येच घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता, याची आठवण डॉ. थोरात यांनी करून दिली. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज म्हणाले, कोल्हापूरच्या इतिहासात मेजर ग्रॅहमचा रिपोर्ट महत्वाचा ठरतो. इतिहासाच्या अभ्यासकांसाठी एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ या निमित्ताने उपलब्ध झाला आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, मराठ्यांच्या इतिहासाची सर्व विद्यापीठाच्या ऑनलाईन बुक स्टोअर उपलब्ध करून देण्यात येतील. त्यांच बरोबर इतिहासाच्या पुस्तकांचे इंग्रजीत भाषांतर ही करून ते नव्याने प्रकाशित करण्यात येतील, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

### दोनशे वर्षांपूर्वीची ऊसशेती, गुऱ्हाळ आणि उत्पादन !

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, दोनशे वर्षा पूर्वी मेजर ग्रॅहमने कोल्हापूरचा सर्वांगिण अभ्यास केला होता. सर्व प्रकारची शेती उत्पादनांबरोबर प्रमुख्याने ऊसाच्या शेतीचा अभ्यास केला होता. ऊसाच्या बियाणापासून गुऱ्हाळघरातील गुळापर्यंतचा हिशोब त्यांनी रिपोर्टमध्ये केला आहे. उत्पादन खर्च आणि उसाच्या उत्पादनातून मिळणारा फायदा याची सखोल माहिती या रिपोर्टमध्ये देण्यात आली आहे. ही सर्व माहिती मी खासदार राजू शेट्टी यांना देणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 AUG 2017 महाराष्ट्र टाईम्स

# 'संशोधनासाठीचा दीपस्तंभ'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'मेजर डी. सी. ग्रॅहम यांनी १८५४ साली सादर केलेला अहवाल हा कोल्हापूरच्या इतिहासाचा आद्य ग्रंथ असून कोल्हापूरच्या समृद्ध वारशाच्या पाऊलखुणा त्यात जागोजागी आढळतात. प्राथमिक तथ्यांचे संशोधनातील महत्त्व अधोरेखित करणारा हा अहवाल आहे. केवळ इतिहासांच्या नव्हे, तर कृषी, सहकार, अर्थकारण, वाणिज्य - व्यवसाय, उद्योग अशा कोणत्याही प्रकारच्या संशोधकाला कोल्हापूरच्या संदर्भात अभ्यास करताना या अहवालाचे स्थान दीपस्तंभाचे आहे, इतका महत्त्वाचा हा दस्तावेज आहे' असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष, डॉ. यशवंतराव थोरात यांनी केले.

## ग्रॅहम रिपोर्टचे विद्यापीठातर्फे प्रकाशन

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे मेजर डी.सी. ग्रॅहम रचित व डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपॅलिटी ऑफ कोल्हापूर (सन १८५४)' या दुर्मिळ अहवालाचे प्रकाशन डॉ. थोरात यांच्या हस्ते विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात सोमवारी झाले. श्रीमंत शाहू महाराज प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

यशवंतराव थोरात म्हणाले, 'आपण इतिहास कसा पाहतो, कोणी आपल्याला दाखवितो तसा पाहतो, की आपल्याला जसा दिसतो, तसा पाहतो, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. भारतीय इतिहासाच्या संदर्भात हा प्रश्न आता अधिक महत्त्वाचा ठरतो आहे. आपल्याला आपला देश कसा हवा आहे? समाजवादी, धर्मनिरपेक्ष की लोकशाहीवादी? लोकशाहीची साधने हाताशी धरून अ-लोकशाहीवादी प्रवृत्ती जोपासल्या जात आहेत. लोकशाही आपल्याला बोलण्याचा हक्क देते, हे जितके खरे, तितकेच ऐकण्याची जबाबदारीही सोपविते, याकडे दुर्लक्ष करून कसे चालेल? आपण घटनात्मक मूल्ये जपली नाहीत, तर राज्यघटना बरखास्त करण्याची वेळ आल्याखेरीज राहणार नाही, असा इशारा सन १९५०मध्येच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देऊन ठेवला होता, याची आठवण डॉ. थोरात यांनी करून दिली. ऐतिहासिक सत्याशी कधीही तडजोड करू नका' असे ते म्हणाले.

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, 'ग्रॅहमचा अहवाल नव्याने प्रकाशात आणून डॉ. पवार यांनी इतिहास संशोधकांसाठी वारसा जपण्याचे कार्य केले आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहू संशोधन केंद्राने गेल्या ४७ वर्षांत अनेक अमूल्य संदर्भग्रंथ अभ्यासक, संशोधकांना सादर केले आहेत. हा संदर्भग्रंथ विद्यापीठाच्या ऑनलाइन बुकस्टोअरवर लवकर उपलब्ध करण्यासह विद्यापीठाचे अन्य आऊट ऑफ प्रिंट संदर्भग्रंथही पुनर्मुद्रित करण्याचे प्रयत्न करू.'

डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविकामध्ये या अहवालाची संशोधनाच्या दृष्टीने बलस्थाने स्पष्ट केली. 'कोल्हापूरची शेती, उद्योगधंदे, जाती, भाषा, चालीरिती, संस्कृती, परंपरा, ग्रंथनिर्मिती, धार्मिकता यांच्यापासून ते अगदी पिशाच्चापर्यंतचा इतिहास साद्यंत सांगणारा हा अपूर्व ग्रंथ आहे', असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात डॉ. थोरात यांच्या हस्ते अहवालाचे प्रकाशन झाले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

## ग्रॅहम यांच्या अहवालातही 'अंबाबाई'च

'कोल्हापूरच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण नोंदी असलेल्या मेजर ग्रॅहम यांच्या अहवालात करवीरनिवासिनी श्री अंबाबाई असा उल्लेख आला आहे. सध्या 'अंबाबाई' की 'महालक्ष्मी' या नामकरणावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ग्रॅहम यांच्या महत्त्वपूर्ण आणि दुर्मिळ अहवालात अंबाबाई या नावाने असलेल्या उल्लेखातून प्राचीन संदर्भ अधोरेखित होत आहे' असे डॉ. जयसिंगराव पवार यांनी स्पष्ट केले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभात बोलताना डॉ. यशवंतराव थोरात. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

15 AUG 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यशवंतराव थोरात : 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपलिटी ऑफ कोल्हापूर'चे प्रकाशन

# ऐतिहासिक संदर्भ छाननीत सत्याशी तडजोड नको

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इतिहास हे एक सत्य असते. त्याचे विश्लेषण वेगळे होऊ शकते. मात्र, त्यातील वास्तव नाकारता येत नाही. त्यामुळे इतिहासाचा आदर राखा. ऐतिहासिक संदर्भांची छाननी करताना सत्याशी तडजोड करू नका, असे आवाहन ज्येष्ठ अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांनी सोमवारी येथे केले.

कोल्हापूर संस्थानचे पहिले पोलिटिकल सुपरिंटेंडेंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी संकलित केलेल्या 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपलिटी ऑफ कोल्हापूर' या अहवालाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठामधील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर शाहू छत्रपती प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे संचालक व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी 'राजर्षी शाहू साहित्य माला' अंतर्गत हा अहवाल ग्रंथरूपात संपादित केला आहे.

डॉ. थोरात म्हणाले, कोल्हापूरचा इतिहास मांडणारा मेजर ग्रॅहॅम यांचा अहवाल अद्‌भूत आहे. यात कोल्हापूरच्या समृद्ध वारशाच्या पाऊलखुणा दिसतात. इतिहास हा तथ्यांमधून साकारतो. नवी तथ्ये संशोधनांती हाती येईपर्यंत उपलब्ध तथ्यांविषयी दुमत असण्याचे कारण नसते. त्यांचे विश्लेषण विविध पद्धतीने होऊ शकते. भारतीय इतिहासाच्या संदर्भात हा प्रश्न आता अधिक महत्त्वाचा ठरतो आहे. आपल्याला आपला देश कसा हवा आहे? समाजवादी, धर्मनिरपेक्ष की लोकशाहीवादी? लोकशाहीची साधने हाताशी धरून अलोकशाहीवादी प्रवृत्ती जोपासल्या जात आहेत. लोकशाही आपल्याला जसा बोलण्याचा हक्क देते, तसा सत्य ऐकण्याची जबाबदारी सोपविते. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपण घटनात्मक मूल्ये जपली पाहिजेत.

शाहू छत्रपती म्हणाले, हा ग्रंथ कोल्हापूरच्या सर्व क्षेत्रांतील इतिहासाचा पाया आहे. यात मेजर ग्रॅहॅम यांनी शेती, त्यातील उत्पादन, आदींबाबत मांडलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने सध्या कार्यवाही केल्यास विविध प्रश्न मार्गी लागतील.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. पवार यांनी कोल्हापूरच्या इतिहासाच्या अभ्यासाचे एक नवे दालन या ग्रंथाद्वारे खुले केले आहे. गेल्या दहा वर्षांपासून दरमहा केवळ एक रुपया मानधन घेऊन शाहू संशोधन केंद्राचे काम पाहणाऱ्या डॉ. पवार यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. विद्यापीठातर्फे हा ग्रंथ ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून दिला जाईल.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. पवार यांनी प्रास्ताविकात या अहवालाचा आढावा घेतला. ते म्हणाले, सन १८४६ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या सूचनेनुसार मेजर ग्रॅहॅम यांनी कोल्हापूरबाबतच्या माहितीचे संकलन सुरू केले. याबाबत त्यांनी सात वर्षे अभ्यास करून हा अहवाल तयार केला. १८५४ मध्ये त्याचे प्रकाशन झाले. दीडशे वर्षे हा ग्रंथ अप्राप्त होता. मूळ ग्रंथ मिळवून शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून त्याचे पुनर्प्रकाशन केले आहे. कोल्हापूरच्या आधुनिक इतिहासाची सुरुवात या अहवालापासून होते. लोकजीवनाचे प्रतिबिंब यातून उमटते. कार्यक्रमास ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, वसुधा पवार, लीला पाटील, य. ना. कदम, सुरेश शिपूरकर, बाळ पाटणकर, अरुण भोसले, अवनिश पाटील, टी. एस. पाटील, उपस्थित होते. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.




नसीर अत्तार

कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठात मेजर डी. सी. ग्रॅहॅम संकलित 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपलिटी ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, शाहू छत्रपती, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

## दीडशे वर्षांपूर्वी 'अंबाबाई' असा उल्लेख

अंबाबाई की महालक्ष्मी यावरून गेल्या दोन वर्षांत कोल्हापूरचे समाजकारण गढूळ झाले आहे. दीडशे वर्षांपूर्वी मेजर ग्रॅहॅम याने त्याच्या अहवालात तीन ते चार वेळा अंबाबाई असा, तर काही ठिकाणी महालक्ष्मी ऊर्फ अंबाबाई असा उल्लेख केला आहे. त्यामुळे साहजिकच यापूर्वी देखील 'अंबाबाई' हे नाव रुढ असण्याची शक्यता असल्याचे ज्येष्ठ इतिहास संशोधक पवार यांनी यावेळी सांगितले.

## पुनर्मुद्रण करा

मराठा इतिहास हा भारतीय इतिहासाचा भाग आहे. या इतिहासाबाबत अमराठी विद्यार्थी संशोधन करतात. या मराठा इतिहासाच्या अनुषंगाने संशोधन करून शिवाजी विद्यापीठाने काही ग्रंथ प्रकाशित केले आहेत. मात्र, यातील इंग्रजी भाषेतील ग्रंथ मिळत नाहीत. त्यामुळे अनेकांची अडचण होत आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने संबंधित ग्रंथांचे पुनर्मुद्रण करावे, अशी हात जोडून विनंती करतो, असे डॉ. थोरात यांनी यावेळी सांगितले.

## डॉ. थोरात म्हणाले

- मेजर ग्रॅहॅम यांचा हा अहवाल प्राथमिक तथ्यांचे संशोधनातील महत्त्व अधोरेखित करतो.
- सत्याशी तडजोड नसते. कधी ते कडू अथवा चांगले असते. सत्य मान्य केले पाहिजे. ते स्वीकारून पुढे गेले पाहिजे, युवकांनी ते लक्षात घ्यावे.

15 AUG 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ...' अद्वितीय ग्रंथ

– डॉ. यशवंतराव थोरात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

तत्कालीन पॉलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅमचा यांनी तयार केलेला आणि इतिहास संशोधन डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेला 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपॅलिटी ऑफ कोल्हापूर' हा ग्रंथ अद्वितीय असाच आहे. यामधून स्थानिक इतिहासाची पुराव्यानिशी सांख्यिकी माहिती मांडण्यात आल्याने त्याची वेगळीच विश्वासार्हता आहे. कोल्हापूरच्या इतिहासाच्या पाऊलखुणा दर्शविणारा हा ग्रंथ अद्वितीय असाच आहे, असे प्रतिपादन अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवतंराव थोरात यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपॅलिटी ऑफ कोल्हापूर' या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. थोरात म्हणाले, माझ्या आजवरच्या कारकीर्दीमध्ये अनेक रिपोर्ट मी पाहिले आहेत; पण १६० वर्षांहूनही अधिक काळापूर्वी तयार करण्यात आलेला हा रिपोर्ट उत्कृष्ट असाच आहे. डॉ. जयसिंगराव पवार हे मराठ्यांच्या इतिहासावर पकड असणारे अभ्यासक आहेत.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, १८५४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या आदेशावरून कोल्हापूरमधील पॉलिटिकल सुप्रिटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी सातत्याने सात वर्षे श्रम घेऊन संकलित केलेला हा साधन ग्रंथ आहे. २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर कसे होते याचे दर्शन घडवणारा हा एकमेव दस्तऐवज आहे.

श्रीमंत छत्रपती शाहू महाराज म्हणाले, हा ग्रंथ कोल्हापूरच्या इतिहासाचा आधारस्तंभ आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, १९७० साली विद्यापीठात राजर्षी शाहू संशोधन केंद्राची स्थापना झाली. गेली १० वर्षे डॉ. जयसिंगराव पवार संचालक म्हणून केवळ १ रुपया मानधनावर त्या केंद्राचे काम पाहत आहेत. हे पुस्तक विद्यापीठाच्या ऑनलाईन बुक स्टोअरवरही उपलब्ध करण्यात येईल. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदिवडेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




**कोल्हापूर : 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सिपॅलिटी ऑफ कोल्हापूर' ग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. यशवंतराव थोरात, श्रीमंत छत्रपती शाहू महाराज व इतर.** (छाया : पांडुरंग पाटील)

## २०० वर्षांपूर्वीही अंबाबाईच

गेल्या वर्षभरापासून कोल्हापूरचे समाजकारण गढूळ झाले आहे. कोल्हापूरची देवी अंबाबाई की महालक्ष्मी, असा वाद निर्माण झाला आहे; मात्र ग्रॅहमने आपल्या रिपोर्टमध्ये ३ ते ४ वेळा अंबाबाई असा उल्लेख केला आहे, तर काही ठिकाणी महालक्ष्मी ऊर्फ अंबाबाई असा उल्लेख केला आहे. त्यामुळे पूर्वीपासून या देवीला अंबाबाई असे म्हणले जात असावे, असेही डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले.

## ऊस पिकाचाही सखोल अभ्यास

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, त्यामध्ये शेती आणि प्रामुख्याने ऊस शेतीचाही अभ्यास करण्यात आला होता. त्याबाबतचे उल्लेख त्यांनी आपल्या रिपोर्टमध्ये केले आहेत. त्यामध्ये ऊस लावणीपासून ते गाळपापर्यंतचा अगदी बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करून उत्पादन खर्च आणि उसाच्या उत्पादनातून मिळणारा फायदा यांचीही सखोल माहिती देण्यात आली आहे.

15 AUG 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कोरीनअॅन्ड्रा इलिगन्स' फूलझाडाचा शोध

## राजापुरातील प्राध्यापकांची कामगिरी

**राजेंद्र बाईत : सकाळ वृत्तसेवा**

राजापूर, ता. १४ : राजापूर तालुक्यात पावसाळ्यात डबक्यामध्ये उगवणाऱ्या 'कोरीनअॅन्ड्रा इलिगन्स चांदोरे, यू. एस. यादव अॅन्ड एस. आर. यादव' या नव्या फूलझाडाचा शोध लावण्याची कामगिरी येथील डॉ. अरुण चांदोरे व डॉ. एस. आर. यादव, डॉ. उषा यादव या तिघांनी केली आहे. दोन वर्षांच्या अथक परिश्रमाने त्यांनी हा शोध लावला. साखरकोंबे परिसरामध्ये या फूलझाडाचा आढळ आहे. यामुळे कमी उंचीच्या कातळ परिसरामध्ये दुर्मिळ वनस्पतींचा खजिना असल्याचे अधोरेखित झाले आहे.

हे फूलझाड तालुक्यातील साखरकोंबे, जैतापूर, नाटे परिसरापासून ते थेट देवगड तालुक्यापर्यंत आढळली. रयत शिक्षण संस्थेच्या आबासाहेब मराठे महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. चांदोरे, शिवाजी विद्यापीठातील वनस्पती विभागातील शास्त्रज्ञ प्रा. डॉ. श्री. यादव आणि सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयाच्या श्रीमती यादव यांना कातळावर हे फूलझाड आढळले. त्याची माहिती न मिळाल्याने त्याच्या संशोधनाचा ध्यास त्यांनी घेतला. या संशोधनामध्ये सहकारी शिक्षकांसह विद्यार्थ्यांचेही सहकार्य या तिघांना लाभले.

### फुलाची वैशिष्ट्ये

- फुलाची लांबी ५ ते ९ सें.मी.
- २५० पर्यंत पुंकेसर, एकच स्त्रीकेसर
- झाडाची उंची २ मीटर
- पाकळीची लांबी अडीच ते साडेचार सेंमी
- फुलांचा हंगाम जुलै ते नोव्हेंबर
- मोहरीच्या कुळातील वनस्पती



राजापूर : कोरीनअॅन्ड्रा इलिगन्स झाडाचे फूल.

### संशोधित नव्या फूलझाडाची अशी नोंद

सदाबहार आणि लक्ष वेधून घेणाऱ्या 'कोरीअनअॅन्ड्रा इलिगन्स' या फूलझाडाचा संशोधित वनस्पती म्हणून जागतिक स्तरावर ९ मे, २०१६ ला न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या 'फायटोटॅक्सा' या जागतिक दर्जाच्या या नियतकालिकाने नोंद केली आहे. त्या नियतकालिकाच्या मुखपृष्ठासह वेबसाइटवर फुलाची छबी आहे. नव्या संशोधित वनस्पतींचा समावेश असलेल्या देशातील 'बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडिया'या पुस्तकामध्येही संशोधित नवी वनस्पती म्हणून नोंद झाली आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरही ५ जून २०१७ रोजी त्याची छबी छापून आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2017
तरूण भारत

# न्यू कॉलेजमध्ये विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभागातर्फे न्यू कॉलेजमध्ये विविध अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये ग्रामीण पत्रकारिता, मुद्रित शोधन, मोडी लिपी, व्यक्तिमत्व विकास, संवादकौशल्य, सुत्रसंचालन आणि निवेदन, रंगमंच परिचय व वाणी कौशल्य, ड्रेस डिसाईन, हिंदी अनुवाद, इव्हेंट मॅनिजमेंट यांचा समावेश आहे. तरी इच्छुकांनी न्यू कॉलेजमधील प्रा. जी. आर. पाटील यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.